
# वय माझे पाच हजार

अनिल नारायण कुलकर्णी



# वय माझे पाच हजार

– अनिल नारायण कुलकर्णी

चतुरंग प्रकाशन

चतुरंग प्रकाशन ०५

वय माझे पाच हजार
अनिल नारायण कुलकर्णी,
मो.– 94220 31416

© अनिरुध्द कुलकर्णी,
पत्ता – ७५, 'आशीर्वाद',
राममंदीरजवळ, दक्षिण शिवाजीनगर,
सांगली ४१६ ४१६,
मो.– 98230 48686

मुखपृष्ठ
सुरेश पंडीत

मांडणी
अभय पाटील

प्रकाशक
चतुरंग प्रकाशन
एफ–४, कलाश्री आर्केड, दुसरा मजला,
राममंदिर चौक, सांगली ४१६ ४१६
मो.–9421800715

मुद्रक
सुनील प्रिंटेक्स, हायस्कूल रोड,
भारत पेट्रोल पंपाशेजारी, महावीरनगर,
सांगली ४१६ ४१६

प्रथम आवृत्ती – २८ फेब्रुवारी २०२१

मूल्य – ₹ ५०/–

# ती आज असती तर...

आयुष्य जगताना बरेच क्षण साधायचे अगदी तीव्रतेने ठरवूनही सुटून जातात. आणि मग असे काही अघटित घडते की सुटलेले ते क्षण अत्यंत खिन्नपणे आठवण्यापलीकडे आपल्या हातात काहीच उरत नाही. माझी अतिशय सुशील, नम्र, अगत्यशील जीवनसखी मंगल साऱ्यांनाच चटका लावून अर्ध्या वाटेवरून माझी सोबत सोडून माझ्या वाट्याला ते सारे अपुरे क्षण तसेच ठेऊन कायमची निघून गेली!

हा सारा लेखन प्रपंच तिच्यासाठी...

# मनोगत...

वास्तविक मी रसायनशास्त्राचा विद्यार्थी. काव्य हा काही माझा प्रांत नव्हे. पण मनाच्या प्रचंड एकाग्रतेत, कधी जिव्हारी लागणारे, कधी मानवतेलाच हादरवून सोडणारे तर कधी मानवतेला अत्युच्च शिखरावर नेऊन ठेवणारे प्रसंग क्षणात मनाचं समुद्र मंथन करून आपसूकच लेखणीत प्राण ओततात.

आयुष्यात मला यशस्वी करणारे प्रसंग जसे घडले, तसेच मनाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडवणारे, खोलवर रुतणारेही घडले! काव्य मला मनाच्या अगदी खोलवर, तळात एखाद्या स्वच्छ स्वप्नासारखं दिसतं. बऱ्याच वेळा रात्री–अपरात्रीच ते अलगद मनातून पानांत उतरतं!

जसं दिसलं, सुचलं तसं मी रेखाटलं! एखाद्या लहान मुलानं काढलेल्या चित्राचं, त्यातल्या रांगडेपणाचं आपल्याला कौतुक नाही का वाटत? अगदी तसं! चित्रकलेच्या निकषावर कदाचित ते उतरत नसेल पण त्याला जसे वाटलं तसं ते मनस्वी एकाग्रतेनं, रंग भरलेलं असतं.

सुदैवानं महेश कराडकर यांच्या सारख्या माझ्यावर निर्व्याज प्रेम करणाऱ्या कवीला हे माझं काव्य प्रकाशित करावं वाटलं. त्यांनीच त्याला अंगडं टोपडं घालून, तीट लावून तुमच्या पुढं ठेवलं! मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे!

तुम्हा वाचकांना पण आवडेल अशी आशा करतो.

**– अनिल नारायण कुलकर्णी**

# अनुक्रम


| | |
|---|---|
| जन्म | ७ |
| ये ना एकदाच भेटीला | ८ |
| रिकामा देव्हारा | ९ |
| बिन माणसांचा देश | १० |
| विणले मनाचे जाळे | ११ |
| अक्कल | १३ |
| वय माझे पाच हजार | १४ |
| आता प्रलय यावा... | १५ |
| मनस्वी चित्रकार | १६ |
| विरह | १८ |
| देव व्हावे | १९ |
| मी आत्मा गिळला... | २१ |
| पूर्वज | २२ |
| मी केव्हाची वाट पहातोय | २३ |
| शोध | २५ |
| श्रीकृष्ण | २६ |
| एकचि रंग | २७ |
| इथे तर सारेच क्षणभंगुर | २८ |
| गुरूदक्षिणा | २९ |
| अशाच एका वळणावर.. | ३१ |
| जग असे असावे... | ३२ |
| शपथ | ३३ |
| नद्या नद्यांच्या अमृतभेटी | ३५ |
| गर्भ | ३६ |
| स्वप्नगंधा | ३७ |
| पितृपक्ष | ३८ |

## अनुक्रम : सखी...


| | |
|---|---|
| कधी कधी | ४० |
| सखी | ४१ |
| बांधापल्याड... | ४२ |
| साद तुझीच ती | ४३ |
| तू | ४४ |
| प्राक्तन | ४५ |
| संकेत | ४६ |
| साथ संगत | ४७ |
| आर्तता | ४८ |

# जन्म

लहानपणी भयंकर कुतूहल
मूल कसं जन्मतं का जन्मतं
कुठून येतं कोण पाठवतं
वय वर्षे बारा, काहीच नव्हतं कळतं
सर्वांचं उत्तर एकच... देव पाठवतो

आता मोठा झालो मिसरूड फुटलं
आणि तसचं काहीसं वाटू लागलं
मन विस्कटलं, बेचैन झालं, धुंदही झालं
काहीच कळेना, असं एकाएकी का झालं
मन, छाती, धडधडणारं हृदय,
सारं अगदी गळ्यापर्यंत भरून आलं
कळेना मन बेकाबू का उधाणलं

दाराची कडी न वाजवताच
म्हणालीस, राजा येऊ का रे...
...आणि कवितेचा जन्म झाला!

■■■

# ये ना एकदाच भेटीला

सारी दोस्ती ओवाळून टाकावी असा भेटावा यार
साध्या गळाभेटीसाठी करावा सारा सागर पार

व्हावे एवढे लहान, ओढावी लोंबती शेंडी टोपीतून
मारून हळूच टपली, करावी नजर आकाशी विलीन!

उमाळून अवचित यावा खदखदून जिव्हाळा
घट्ट मिठीत घेऊन आभाळी टेकवावा झोपाळा

सोडाव्या कागदी होड्या पावसाळी पाटातून
पाठी घसरावं नदीकाठी फाटक्या चड्डीनं चिखलातून

पाडावे चिंचा आवळे, दोन भरावे खिसे, लपून छपून
वाटे चिमण्या दातांचे, लावून मीठ, दूर डोंगरी बसून

माराव्या टार्झनच्या गप्पा वडाच्या पारंब्या धरून
मावळे स्वार गाढवावर, शिवा लाकडी तलवार उपसून

किती आठवू गड्या कोरलेल्या गमजा काळजावर
पार गेलं अश्रूसंगे वाळून, कोवळं बालपण उरावर

गुंठाभर जमिनीसाठी जु आई बाच्या खांद्यावर,
पण ये दोस्ता कधीतरी भेटीला? खाऊ कांद्यासंगं भाकर

नाही वाटणार भ्या घेऊ झोकं पुनः पारंब्यांवर
मारू गप्पा, कोंबू खुशीत दुःखाला दोनी खिसाभर

होऊ दे रे, आम्हा रोजचाच अंधार, पेटवू पारावर मशाल
बसु दे रे वस्तीला मानगुटीवर, वझं करजाचं खुशाल
वझं करजाचं खुशाल...

■■■

# रिकामा देव्हारा

एक दिवस उठलो,
देव्हाऱ्यातले सगळे देव उचलले
देव्हारा रिकामा केला
सगळेच देव दाटीवाटीने
मनाच्या गाभाऱ्यात ठेऊन दिले
चला, रोज अंघोळ घाला
देव्हारा पुसा देव पुसा
गंध उगाळून लावा
फुले वहा, निर्माल्य काढा
सारेच कर्मकांड संपलेच की
दोन दिवस मजेत गेले.

लक्षात आला देवांचा गनिमी कावा
देव काही कमी उपद्व्यापी नाहीत
दूर देव्हाऱ्यातले देव अजूनच जवळ आले
माझ्या बरोबरच अंघोळ करू लागले
लोक माझी खोटी आरती करत
त्यातच आपली हौस भागवू लागले
इथं पर्यंत सारं ठीकच होतं
गप्प बसावं की नाही... पण...
आता मला वागायचं कसं
ते पण तेच शिकवू लागले
आई शप्पथ सांगतो
माझ्या वागण्याला
देवपण येतं की काय याची भीतीच बसली
मित्र हो सांभाळा,
आता देव वरून नाही
तुमच्या जवळूनच बघतोय तुम्हाला...

■■■

# बिन माणसांचा देश

का कुणास ठाऊक
कधीही न भुंकणारी कुत्री
चवताळून उठली
रस्त्यावरून गुमान जाणाऱ्यांचे
लचके तोडू लागली
त्यांच्या पालकांनी साखळ्या
केव्हाच मोकळ्या केल्या
सोम्यागोम्यांनी दावा साधला
छू... छू... करून

कोवळ्या पोरीबाळींचा जीव मुठीत
सैरावैरा धावत सुटल्या
आता कुठलाही नर दिसला की
त्या असंच करतात

हल्ली छान उमललेली फुलं
टवटवीत, झाडांवर दिसतच नाहीत
कळ्या कुस्करायची मौजच वेगळी
ऐकलंय कोंबडीपेक्षा एक दिवसाची
पिल्लं फार चवदार असतात

हे कलियुग संपणार केंव्हा?
सोन्याच्या भावानं भविष्य विकणारे
सांगायला तयार नाहीत
चलती ...फक्त चलती सर्वांची
रस्त्याच्या कडेला
अंगाचं मुटकुळं करून
खपाटी पोटानं
मरायला सोकावलेल्याना सोडून

■■■

# विणले मनाचे जाळे

मनात हुरहूर कशाची?
भीती भविष्याची?
की उद्याच्या लढ्याची?
की अजून न लढलेल्या
लढ्याच्या पराभवाची?
की भूत काळाच्या घोडचुकांची
ज्याची अजून शिक्षाच नाही झाली!
मनाने स्वतःभोवती उभारलेल्या
भिंती कोसळण्याची भीती
स्वतःच स्वतःला अंधारात कोंडून
पुन्हा अंधाराच्या बागुलबुवाची भीती
की मनानेच बांधलेल्या किल्ल्यावरून
कडेलोटाची भीती
मनाबरोबर दोस्ती केली
तेच चुकले!

मनात नुसते विचारांचे वादळ
हे करू की ते करू
हा चांगला, तो वाईट
हा शहाणा तो मूर्ख
हा मित्र म्हणून बरा
तो शत्रू खतरनाक
म्हणजे ऐकावे जनाचे
करावे मनाचे हे चूक की काय?
म्हणून मना सज्जना भक्ती पंथेची जावे
की काय?
मग हा श्रीहरी आणि कोण?
पाविजेतो स्वभावे म्हणे! हा कोण पावन करणारा?
सोडा मनाला मोकळे
हे नको करू असे होईल

ते नको करू तसे होईल
त्यापेक्षा प्राण खरा असावा
हां! मनाचा बॉस प्राण!
म्हणूनच सावरकरानी प्राण तळमळला म्हटलं
मन तळमळलं नाही म्हटलं!
प्राण सदा शरीराबरोबरच रहातो
मन सदा सैराट सुटलेलं!
म्हणूनच मनाला लगाम घाला म्हणतात होय?
मन भरकटलं मन विस्कटलं
मन उदास झालं, विषण्ण झालं
मन हादरलं! कधी प्रसन्न ही झालं!

दे उडवून मनाला!
हं! आता जरा बरं वाटलं!
कुणाला बरं वाटलं?
मनाला!

■■■

# अक्कल

परवा कुणी हितचिंतक म्हणाला
तुझी अक्कल गुडघ्यात आहे
इतकं बर वाटलं म्हणून सांगू
लगेच दोन नव्या knee कॅप्स चढवल्या...

कुठंही नजर टाकली तर सारे भाट
गुलामगिरीचीच बुद्धी पूजा करणारे
अरे ताटात नवा पदार्थ वाढलाय
घ्या मोकळ्या मनाने चव तरी
पण, बुद्धी गुडघ्यातच आहे, म्हटलं नीट पहावं
मेंदूत बुद्धी ठेऊन करतात तरी काय?
कुणी वंदे मातरम् म्हटलं म्हणून जाळपोळ
तर कुठे नाही म्हटलं म्हणून बोंबाबोंब
कुठं गाय कापली म्हणून दोन चार मुडदे पाडा
तर कुठे गाईची पूजा केली म्हणून सरकार पाडा
उत्तम मेंदू बुद्धी वापरून कुठं बँक लुटा
तर आमची धार्मिक, जातीय मेजॉरिटी म्हणून
दगडं घालून दुकान फोडा, शाळा बंद पाडा
गाडी समोर आले म्हणून ज्येष्ठांची थोबाडं फोडा
मी अगदी हळुवार गुडघ्यावर हात थोपटला

म्हटलं बाबांनो अशीच इथंच सांभाळून ठेवा पाजळत...
डोक्यावर चढू देऊच नका आपली आपली अक्कल

■■■

# वय माझे पाच हजार

माझे वय म्हणे पाच हजार वर्षे!
सांगू कसे मोजले असेल ते वय
ड्रील करता मीच सोसले दुःख येशूचे
गर्वाने मोजित वलये ते दाखले देती वयाचे

बीजातून जरा कुठं वर आलो असेन
तेंव्हाच स्वतःभोवती मी हद्द आखली
कधीच नाही मग मी मर्यादा सोडली
माणसाने ना कधी माणुसकी बाळगली

फोफावली वाढ माणूस का त्रस्त झाला
मज उखडण्या म्हणे तो रस्ता मधे आला
देवापल्याड बुद्धी थोर तुझी की रे झाली
घनदाट सावली तू क्षणात रखरखी केली

कोपऱ्यात बिचारे एकही नाही सोडले पोर
थोर मानवा चालवली तू कुऱ्हाडीची कोर
एकलकोंडा मी आता तुटला रे सारा परिवार
चुकूनच झाले आज माझे वय पाच हजार

तीच माणसे त्याच करांनी करती मम सत्कार
हासत वाहती आमचीच आम्हा फुले चार
पण...
हृदयात सलते सोबत्यांची सर्द आठवण
सर्दफुले ती जड हाती करतो त्यांना अर्पण

■■■

## आता प्रलय यावा...

असतो कोणी रंक आणि कुणा ठाव कोण राव
कुणी लावून तूप मारतो खुशाल मिशीवर ताव
भाकर तुकडा हाती नाही तर तूप हवे कशाला
खुशाल ताणतो पाय, घेऊनी दगड एक उशाला

आम्ही फूटपाथी! देहसापळा, कशास जागा हवी
पाय दुमडून पोट खपाटी खुशाल दैवा टाळी द्यावी
नाही ठाऊक देव कुणाचा का पापपुण्य धरून बसता
देवाघरीच घुसखोर आम्ही जर, मानवाचे काय पुसता

निर्मिलेले प्राणी भक्षती, पाहून लीलया एकमेका
हर्षे बनविला पूर्ण मानव, वाटला नाही कुणा धोका
नाही उमगले आम्हा तेंव्हा कर्तृत्व दांडगे माणसाचे
गावीही नव्हते आमुच्या त्याचे गुण गळे कापण्याचे

दिग्मूढ दगडी देव राऊळी हताश होऊन बसले
दुधातुपाने रोज न्हाऊनी गुन्हे बिनशर्त माफ केले
नरबळी, भूकबळी वर कोवळी कळी हवस बळी
प्रलयच हा उपाय, म्हणे विठुरायाची मूर्त सावळी

केव्हापासून मी प्रलयाची वाट पहातोय...

■■■

## मनस्वी चित्रकार

अंतरंगी भिजवून कुंचला, येते चित्र काढता?
पूर्ण समाधान होई तो, न थांबता न थकता
एकटक नजर होवो थक्क, चित्ती एकरूप थेट
माथा घट्ट तुज चरणी, घळघळे काजळकाठ

अंतरंगी वाहो भरुनी निळासावळा रंग
वेणूनादी रंगून राहो उभा उरी श्रीरंग
भले होऊ दे रंग ओला लेऊनि नयनजल
क्षण एक उभा रहा ना रे तू मुरारी निश्चल?

बसतील ना रे गाई तोवर तुझ्या चित्रासाठी
विसावतील का सांग पाखरे चिडीचुप यमुनेकाठी
थबकुनि पाहिल का रे यमुना तरंगात स्मितरेखा
हे जरी ठाऊक तिजला मी चित्रकार नवखा

सांगशील श्रीकृष्णा का तू, गोपी–सवंगड्यांना
खुशाल काढोत खोड्या, मी चित्रात रंगताना
देऊ का रे निळा सावळा, रंग दूर डोंगरांना
जड जाईल का रवीला, सावळ्यात रंगताना

तरंगेल का गोधूळ आज, होऊनी निळीसावळी
घुमेल का रे घंटा, दूर मधुर शांत राऊळी?
जमेल हे सारे पण दाटे, भयभीत मनी काजळी
वाहशील ना तोवरी तुझे ते, सूर ती भरून ओंजळी

सारी जुळवाजुळव केली, का राधा रुसून बसली
बासुरी पडता कानी, येईल का ती चोरपाऊली
क्षणभंगुर त्या पर्णावरी मी रेखु कशा स्वप्नरेखा

नसानसातून थरथर कैसी, व्हावा तू मम सखा?
भलतीच अपेक्षा बा मुकुंदा, होवो अंतर्मनीचे शिल्प
अंतरंग कृष्ण नि राधा घडू दे कायाकल्प
घडू दे कायाकल्प...

■■■

# विरह

विरह तुझा चित्ती राहो, नयनी तुझे रूप
गळा तुझे गोड नाम हृदय होवो चिरदंग
रमो मन नामस्मरणी माथा सदा तुझ्या चरणी
उठो वादळ एकच भवती 'पांडुरंग' 'पांडुरंग'।।

कर तुझे कटेवरी देती आशीर्वाद अमृतधारा
एकदाच दे कटाक्ष देवा नको प्रसाद दुसरा
गळो द्वैत एकदाचे फुलो मनाचा पिसारा
घुमो नभी एकच स्वर रे 'पांडुरंग' 'पांडुरंग'।।

फिरलो किती दाहीदिशा दाटे अंतरी निराशा
तूच दे रे टाळी आता होवो गजर दिशादिशा
भेदभाव रक्तामाजी नासले गोजिरे बियाणे
औंदा पिको तरारुन भाव 'पांडुरंग' ।।

दिसांचे क्षण राहूनी गेले किती अधांतरी
मायबाप वृध्दाश्रमी नाम्या झोपला अंधारी
काय दिवस आले बापा नको राहू विटेवरी
घ्या हो तुम्ही टाळ, मुखी बोला 'पांडुरंग' ।।

दोन फुटी जमिनीसाठी धार कुऱ्हाडी लावता
तुटली सारी नाती गोती भाऊ भावा पुसे पुसता
ना राहे बहिणाबाई नाही सुटली कोवळी पोरं
गाऊ कसा कसायासंग देवा 'पांडुरंग' ।।

■■■

# देव व्हावे

ऐकलं होतं माणसातच
देव असतो
पण पाहिलाच नाही कधी
...हां! राक्षस मात्र पदोपदी
म्हणूनच, अजूनही उघडी द्रौपदी

भाऊ बहिणींची मायाही आटली
टीचभर जागेसाठी
कोर्टाच्या पायरीवर
जराबी लाज नाय वाटली

बापाला बाप म्हणणं
रोजचंच जणू गाऱ्हाणं
मरण्या अगोदर
मुकाट्यानं फक्त सह्या करणं

मान कापणं, गळा कापणं
गवत कापण्याएवढं सोपं झालं
ते आता काम शिंप्याचं
नाय राहिलं

आया रडतात बाया रडतात
मुलं रडतात मुली रडतात
शील सांभाळायचं का
इस्टेट सांभाळायची?

इभ्रत पत कशाला म्हणायचं
ते रोज फक्त शाळेतच गिरवायचं
गुरुजींना हाणायचं जोड्यानं
भिजवायची शाळा पेट्रोलनं

देवा कुठवर हे आम्ही पाहू
की देव होऊन आमच्याच
पायाचं आम्हीच तीर्थ घेऊ?
नाहीतर हुडक आता बा श्रीकृष्णा,
नवा अर्जुन...
पुन्हा एकदा सांग नवी गीता

■■■

# मी आत्मा गिळला...

मी आणि माझा आत्मा
काय प्रकरण आहे बुवा हे?

ठरवलं आत्मा वेगळा करू

तेवढ्यात एक डास चावला, पटकन मारला
माझ्या शरीरानं शाबासकी दिली

माझा आत्मा गालातल्या गालात हसला
म्हणाला डासाच्या आत्म्याचं काय?

तोही माझ्या आत्म्या शेजारीच होता हसत उभा
अरे माझं रक्त प्यालास वर हसतोस?
ते काम माझ्या शरीराचं, माझं नव्हे
मी चक्रावलोच, हे आणि कुठं शिकलास?
माणसाकडूनच! ...मी डासाएवढा उंच उडालो

म्हणाला माझं शरीर एकाला चावणार होतं
तोच दुसऱ्या माणसानं त्याची मानच कापली
माझ्याच सारखं हसत हसत!

डासानं दुसऱ्या डासाला चावल्याचं ऐकलंय कधी?
तरी अजून मेलेल्याला चावण्याची विद्या
नाही शिकलो बुवा तुमच्याकडून...
मढ्याच्या टाळूवरचं लोणी खाता ना तुम्ही?

आता मात्र मी दचकलोच
माझ्या आत्म्याला मी पटकन गिळून टाकलं
तेव्हापासून माझा आत्मा घट्ट मिठीतच ठेवलाय...

■■■

# पूर्वज

काय हो आजी असं का बसलाय
साऱ्या जगाचं दुःख पांघरून बसलाय
काय सांगू तुला सत्तरी झाली वयाला
घोटभर शाप पानी, कोर नाय खायला
काय सांगू बाबा कसला संसार कसलं घर
आभाळाचं छपार चिक्कल गुडघाभर
दिवाळी म्हनू नको दसरा म्हनू नको
लाज झाकायला कायम हीच लक्तरं
आनी लाज तर कशापायी झाकायची
लाज एकच वाटतीया, पॉट मारायची
पोरं तर नाय बाबा उपाशी मारायची
म्हनून धडपड, वाकून बी चालायची

तुझं बराय बाबा झाडावरच जगायचं
या झाडावरनं त्या झाडावर उडत रहायचं
पोरं गुमान खात्यात पाला कशापायी उपाशी
झाडाची फांदी टेकायला फांदीच उशाशी

अगं म्हातारे आमची टोळी लय मोठी
तुमच्यागत आते, मामे चुलते नाय आडकाठी
कुनाचीबी पोरं कुनालाबी कवेत घालत्यात मिठी

पन सांग म्हातारे तू का गं एकटी?
कसं सांगू बाबा, मानुस सदा अप्पलपोटी
येक ईचारु सांगशील काय
आमचा जगभर गोतावळा मजेत हाय
तुमी शिकले सवरले तरी झालं काय?
आमी पूर्वज मानसाचे म्हणता, पटतच नाय!

■■■

# मी केंव्हाची वाट पहातोय

जाताना बराच वेळ कारणं सांगत होता
म्हणाला घराच्या भिंती द्वेषाच्या आहेत
आणि खिडक्याना तावदाने रागाची
कळतं का तुला काही
दारे सताड उघडी ठेवलीस असूयेच्या वादळासाठी

तू या घरात आलास तेव्हा मांगल्य हसत होतं
भेदभावाची पुसटशी रेषा पण नव्हती
ना हसायला मर्यादा होती
ना मनसोक्त रडायला बंदी
ना कुणाच्या मुक्त प्रवेशाला नाराजीचे काटे होते

तू मोठा होत गेलास तसं सारंच नासत गेलं
मालकी हक्क गाजवत गेलास
कपड्याचा हव्यास, पैशाचा हव्यास श्रेष्ठतेचा पण
सगळं माझं माझं म्हणत गेलास
या घराच्या विटेविटेवर तुझं नाव कोरत गेलास

मला नाही करमत इथं आता, परकं वाटतं म्हणालास
आणि सरळ चालू लागलास एकदाही वळून न पहाता

मग मात्र मी हादरलो.. विटके पडदे फाडून टाकले
खिडक्या दारं सारं सारं बदलू लागलो
खोट्या भिंती पाडून टाकल्या
सारं आभाळच घरात घेतलं
येणाऱ्या जाणाऱ्याला सताड उघडं ठेवलं

आता मी त्याची फक्त वाट पहातोय
माझा तो आत्मा कुठं दिसला
तर सांगाल का त्याला तुम्ही कोणी
म्हणावं, जन्मला ना तेव्हा सारखचं घर ठेवलंय त्यानं
असशील तसा परत ये रे, म्हणावं...

■■■

## शोध

आज अचानक कातर वेळी
आला कसा गं कान्हा दारी
तुझी राधा किती बावरी
कुठे लपवेल ती तुझी बासरी?

हळूच गेली मग परसदारी
फितूर तुला, ती गाय हंबरी
जग सारेच तव नयनी विरले
तरी बावळी तव अंतरी लपली

म्हणती, ठेविले अनंते तैसेचि रहावे
पण इर्षा मनी आपलेच भाग्य उजळावे
पण शोध शोधुनी ना मुळीच कळले
कैवल्य अंतर्मनी लोळत पडले

या विश्वात्मक देवा अंतरी
माझे मीपण सुखे लपवावे
का युगे युगे पैलतीरी शोधावे
सारे गवसेल तो तोषता, पसायदाने

■■■

# श्रीकृष्ण

स्वप्नात शोधतो मी ती श्रीकृष्णाची मुरली
वर्षे हजारो झाली ना धुंदी तरी ओसरली
गोपगोपिका झाले वेडे धुंद जाहली कालिंदी
शांत झाल्या गाई गोजी विसावल्या चिदानंदी

वृक्षाची त्या गडद सावली पाय पसरून बसली
क्षणात कैसी पक्षी कुंजने शांत शांत जाहली
कळेचना मज गीताई तव अर्जुना काय सांगे
चेतवता तू मुरलीचे सूर चराचरांचे अंतर्मन जागे

कोण म्हणतो राम होता, होती त्याची सीतामाई
वानर कधी सेतू बांधती खुळचटच ती नवलाई
हजारो वर्षांचा इतिहास आता झाला पुराणवादी
थोर शूर वीर मर्दानी हरले इतिहासकारांच्या नादी

सांगू कृष्णा तुला? ठेव मुरली घट्ट तुझ्या करतली
अस्तित्वावर तुझ्या बघ आता कृष्णछाया दाटली
हतभागी आम्ही षंढ येईना चेव मुळी मुठी वळोनी
वाट पाहू किती, का तुला कळेना चढली धर्माला ग्लानी

■■■

## एकचि रंग

गाता पांडुरंग दिसतसे एकचि रंग
जाळुनी अहंकारा हो विठ्ठलनामी दंग
ना कणभर ओझे वाहिले जन्मता तू कुशी
काय शोधीशी तू पर्वत मायेचा तव उराशी

कूस जोडून मायेची ऊब नवकोट नारायणाची
माऊली ठेवून उपाशी रास कुणा हवी रे सोन्याची
माऊलीच्या पदराविना रडे, राजा होई रोज भिकारी
उघड डोळ्यावरची झापड कर जोडूनि विठू चाकरी

दिसते ना रे सरळ वाट तुज, तिथेची विठुचे धाम
बघ विठ्ठल चरणी संतोषे, तो मैतर हरीचा सुदाम
काय माझे काय तुझे, ह्रदयी उभा विठू सावळा
बघ अनवाणी नाचे कैसा आनंदे संतांचा मेळा

विचार माऊलीला का मानव जन्म हा तुज आला
नको रोज साठवू अपुण्याईच्या धनराशी उशाला
वाटते जरी जाशील रथातून पांघरून शेला जरतारी
कफन राख ही जपेल खचितच फक्त विठ्ठला विठ्ठला

■■■

# इथे तर सारेच क्षणभंगुर

माझेच हे सारे तर मग मागू काय देवा तुला?
मी क्षणांचा वाटसरू रेऽऽ मज मालकी हवी कशाला?
सारे इथून घेतलेले मग वाटे देऊ कुणाला?
उधळून टाकण्याचे हे क्षण, मोजू तरी कशाला?

केली दुःखात साथ ज्यांची श्रीमंत करी मनाला
चैनीतल्या सुखांची मग झोळी बाळगू कशाला?
दे फेकून उधळून दे सारे, ते तर येथून घेतलेले
क्षणभंगूर आयुष्य तुझे रे, श्वास न् श्वास मोजलेले

केलेस खूप गोळा, मांडलास व्यस्त पसारा
का अज्ञात तुला रेऽऽ हा प्रवास घडीभर सारा
मांडून हिशोब चोख, तू रोज ठेविसी उशाला
राहील शून्य बाकी मग मोजतोस तरी कशाला?

आता राहिला एक प्रहर! जाईल अवसान गळून पार
वाहतील निर्जीव फुलांचा हार, मुर्दाड वृथा अश्रू चार
अजूनही मन का बेताब, का सुसाट उधळे सैरावैरा
ना राहील देह वेड्या, ना राखेल राख तो पिसाट वारा

■■■

# गुरूदक्षिणा

मी मानव तू ही मानव
मग केल्या कुणी या सरहद्दी
मी ब्राह्मण, तू मागास
हा यवन, तो किरीस्ताव
साऱ्या धरणीमातेचे पाडले प्लॉट
घेतले वाटून आपापसात
इकडे तू येशील तर खबरदार
तंगडं तोडीन फिरशील दारोदार

बरं केलंस तू माझंच दार ठोठावलस
तू निष्पाप, उगा बळीचा बकरा झालास
आई बाबा लहान्या भावा बहिणीला
अग्नी देऊन अश्रू पुसून आलेला तू
आणि...
तुझं घरदार जाळून, शेकत बसलेला समाज
म्हणालास गुरुजी मी इथंच रहायला आलो
विश्वासाला दाद देत घेतलं मिठीत तुला
आज मात्र यायला जरा उशीरच केलास
तू तरी काय करणार? मी नव्हतो बाप तुझा
तुला रजा तरी कशी मिळणार?
शिवाय विमान, व्हिसा सारे उपचार
थेट माझ्या थंड गार शरीरावर पसरलास
तू एकटाच ढसा ढसा रडलास
शांत झालास कपाळावर ओठ टेकलेस
केसातून हळुवार हात फिरवलेस

माझ्या आईची आठवण करून दिलीस
परत तसंच मिठीत घ्यावं वाटलं रे तुला
पण हातच हलेनात! पुन्हा ओक्साबोक्शी रडलास
म्हणालास गुरुदक्षिणा द्यायची राहीली गुरुजी
तुझे गरम अश्रू माझ्याच डोळ्यातून ओघळले
घटा घटा प्यालो...
खूप बरं, गंगाजळ प्याल्यागत वाटलं
कुणी न दिलेली मिळाली गुरुदक्षिणा

आता एकच कर तुझ्या घराला
कुंपण कधी घालूच नकोस
दारही सतत उघडच ठेव
तू माझ्याकडं आलास ना तसाच
कुणी खोल कोरडया डोळ्यानं
तुझ्याकडं पण नक्कीच येईल

जनावराहून हीन मानव जात असते
येणारच आणि येतच रहातील
तूच थारा दे बाळा त्यांना...

■■■

# अशाच एका वळणावर..

अशाच एका वळणावर
थकुन बसलो होतो मैलाच्या दगडावर
दूरवर वळून पाहिले मागे
खूपच चालून आलो आपण!

अरे! पण चित्र रंगवायचं राहूनच गेलं...
मग आता आपण एकटेच का?
किती लोकांची साथ सोडली आपण
किती लोकांचे बोट सोडले आपण
किती लोकांना दुखावले आपण
काय काय द्यायचे राहून गेले
काय काय सांगायचे विसरून गेले
कुणावर उगा रागावलो आपण
कुणाचा नाही काढला रुसवा
क्षमा कुणाला करायची राहून गेली
कुणाची माफी नाहीच मागितली
कुणाचे अश्रू पुसायचे राहून गेले
कुणाला जवळही घ्यायचे राहिले

आता उजवीकडे पाहिले
अजून किती चालायचे... नाही उमजले
मग हे सारे करायचे केव्हा
थकलो ...जमेल तरी का आता?
जाऊ दे....
चार तरी अश्रू इथेच वाहू देत
निदान माफी मागितलेली कळू दे...
देवा फक्त माफी मागितलेली कळू दे...

■■■

# जग असे असावे...

पुनः बसून जात्यावर रम्य पहाट उगवावी
हाती खुंटा बहिणासंगे नित्य मुखी ओवी यावी
अंगणी कुणी सडा शिंपिता काऊ कोकत यावा
हर्ष मनी तो बंधू येता, ये माहेरीचा सांगावा

सख्या सहेल्या जमून घालू पिंगा झाडाभवती
पंचमीच्या सणी झोका, राज्य जाय गगनावरती
दृष्ट काढति माय, माऊल्या भीती दाटल्या उरी
गालावरी तो कर मायेचा, माय बांधते तोरण दारी

बालगोपाल घेऊन खांद्यावरी गाव गाव मिरवीती
पुरे गाव लोटले उधळण्या लाड ते ग्रामकन्येवरी
घासभराची अवीट देवघेव, प्रसाद गोडधोड घरी
रुते घास, नयनी गहिवर, जाय कन्या ती सासरी

आणि आता...

कुठे आहे रखुमाबाई, गेला कुठे विठुबा सावळा
नाही थांबला राऊळी राम, राधा शोधते घननिळा
कुठे बुडाले ते दिवस, कुणी तोडली रक्ताची नाती
गिधाडे खोळंबली कधीची, उरली रुपयांवर प्रीती

आधी बदलु सारे आपण, बदलेलच बघ विश्व सारे
नभी दाटे घन अंधार तरी लकाकती किती शुभ्र तारे
ही निर्मिती ईश्वराचीच, नको पडो कधी विसर देवा
वसुदेवाचे कुटुंब हे, भल्या पहाटे वासुदेव दारी यावा!

सूर गोड, मंगल, मंजुळ पहाटे पहाटे वासुदेव यावा
सखे वासुदेव यावा..!

■■■

# शपथ

काय छान दिवस होते ते!
किती बिनधास्त कुटुंबं
आपले संसार मांडून
घरटी सजवून रहात होती.
कुठून कुठून एकेक काटकी
चोचीतून आणून घर सजवत होती!
छकुल्यासाठी सहज परवडणारी
आपल्याच उपटलेल्या कोवळ्या
कोवळ्या पिसांची मऊ गादी
बनवून लुसलुशीतपणाची
पन्नास वेळा खात्री करून घेत होती!
दुष्ट घारी कावळ्याची नजर चुकवायला
मीच आडोशाची खोबण दाखवली होती!
छोटी छोटी पिल्लं आईबाबा नसताना
मीच सांभाळली होती!
नवीन पालवी फुटली की
दिवाळीचा आनंद सगळ्यांनी
पाहुण्यांसह लुटला होता!
झालं की जगून!...

आता कुठली पालवी फुटायला!
डोळ्यात प्राण आणून वाट पाहिली वर्षभर!
कुणीच नाही फिरकलं रे!
पायाशी घडीभर टेकायला पण
कोऽऽऽणी नाही धजावलं!
अंगावरच्या खपल्या एक एक
गळून गेल्या!
पण जखमा काही पुनः

नाही भरून आल्या!
आता असंच चालायचं!
जुने दिवस आठवत
हुंदका गळ्याशीच घट्ट
रिचवायचा!
वाटलं होतं म्हातारपणी
आपली नात्यागोत्याची मंडळी
थोडी तरी सावली धरतील डोकीवर!
कुणीच जवळ फिरकलं नाही!
रस्ता रुंदीकरणाची सुटबुटवाली
धुळ उडवत येऊन गेली!
छाताडावर एक मोट्ठी
फुली मारून गेली!
मनात म्हटलं पुढच्या फेरीला
चार माणसं तरी घेऊन या रे
सायबानू!
हाडं आहेत माझी चितेला
फक्त खांद्याला चार
आणि पुढं मडकं धरून
रडायला एकच हिरवी गार
डहाळी आणाल का रे?
शपथ आहे तुम्हाला!

■■■

# नद्या नद्यांच्या अमृतभेटी

हो! गुंफतील सरिता एकमेकींचे हात हातात आता
होणार रे मातृभूमी माझी सुजलाम् सुफलाम् आता
जाऊ देत, धर्म, जाती एकारंगी मिसळून आता
मानवतेचा ध्वज फडकू दे, विश्वासाठी भारतमाता

सुखी राहो विश्व सारे ज्ञानेश्वरे रेखीले स्वप्न उराशी
ना निद्राधीन कुणी जीव तो ना राहो तळमळत उपाशी
प्रश्न पडे मज भगीरथाने, उदंड पाणी का आणावे?
असेल पडले स्वप्न तयाला, अवनीने हिरवे लेणे ल्यावे

पुरे झाले धर्मासाठी गर्दन उडवून रक्त शिंपणे
अरे मानवा आपुले या धरती वर, दोन घडीचे जिणे
का निर्मिले ईश्वराने ठेऊन तुला अटल विश्वास
वृक्षवल्ली सकल प्राणीजीवा द्यावा ना मोकळा श्वास

स्वार्थी होऊन नकोस वळवू जल सारे आपुल्याच दारी
मुके प्राणी तहानलेले सोडतील प्राण कोरड्या किनारी
नकोस लावू धावण्या तृषार्त मुकजीवा मृगजळापाठी
होईल व्याकुळ भगीरथ तेव्हा थेंब थेंब अश्रूसाठी

तुडुंब भरला सागर आता प्रलय आणलास रे तू दारी
जोडून नदीला नदी शेतकरी पाजू दे पाणी शिवारी
तृप्त जाहली बघता सृष्टी आनंदाने उधाणेल सागर
त्यास वाहुनी घोर-चिंता, निवांत नीज घेईल ईश्वर!

ओवाळून ज्योती देशील तू, तो शालू हिरवा वसुंधरेला
देव देवता इंद्रा सवे बघ हर्षे मिळवतील स्वर्गधरेला!

■■■

# गर्भ

मुळावर सोसू किती घाव
गळती पाने, कोवळी फळे
किती घाव कुऱ्हाडीचे कठोर
जड झाले ओझे उरावर

का केलीस वसाड ही सृष्टी
आता वरुणाची इथे वक्रदृष्टी
ढग पण रडून झाले मोकळे
मिटून डोळे सूर्य पसरे झाकळे

चहुबाजूला द्वेषाचे फुत्कार
गे सरस्वती कर वीणेचा झंकार
आपुले सारे संचित पुण्य
जोडी बाळासाठी नाळेतून

आता एक ज्ञानेश्वर माऊली
उभी देई संगे गीतेची सावली
पायऱ्या कठीण हात देईल सोपान
मागे मुक्ताई उभी देईल प्रकाशाचे दान
तो एक गुरू रे धीराचा
सडा पडेल आशीर्वादाचा

राहिला एक आधार आता
मज आईच्या गर्भाची दोरी
काय दुःख सावरून बसला
श्रीकृष्णाने तर द्वारका सोडली

■■■

## स्वप्नगंधा

हलकेच उलटूनी माप तू, आलीस स्वप्नगंधा
मग नाजूक पाऊली उमलत झालीस भावबंधा
उधळुनी मापासवे, स्वैर यौवन बंधमुक्त झाले
धडधडत्या तव हृदयामधुनि चंदनधुंद गंध झाले
सरू नयेत कधीही स्पंदने उन्मत्त श्वासातली
विसरू नयेच कधीही ती शपथ, पापण्यात भिजलि
किती उतावीळ! ममहृदय, तू क्षणी जोखलि विभावरी
माझे बिंब मी पाहिले हरपुनि, तव हृदयी बिलोरी
नको सोडवू सखे कर माझे, नको सोडवू ही मिठी
नको थांबवू कुंजने, कदापि कानातली चोरटी
सजा भोगण्या कसलीही सदा तैयार मी यामिनी
शपथ तुला, नको कोमेजू तू कधीच सौदामिनी
सखे चालू दूरवर, एक ऱ्हीदम, जन्मजन्मांतरी
चित्रगुप्ताद्वारी लाजे राजहंसयुगुल खास... तोवरी!

■■■

# पितृपक्ष

त्या थंडगार वंशवृक्षाखाली
निरांत सोबत स्मरण सावली
मऊ पाऊले मातपित्यांची
कधी पखरण सुसंस्कारांची
कधी शिकवण मार्दवतेची
बोलण्यातूनही नम्रतेची
नात्यांची गाठ घनिष्ठतेची
पक्की फांदी क्षमाशीलतेची
भाषा सदा जिव्हाळ्याची
बोच असावी उद्दामतेची
शिदोरी ही पिढ्यापिढयांची
ओलावलेल्या आठवणींची

■■■

# सखी



# कधी कधी

नदीसारखं जगावं
सहन होतय तोवर सारा कचरा
बरोबर ठेवावा
फारच वाढला तर आपणच
वळण घेऊन तिथंच सोडावा

भूतकाळाचा गाळ पायाशी ठेवून
पुढं पुढं वहातच रहा
येणाऱ्यांनी यावं, बघावं
बेफाम होऊन उधळत रहावं
हरवून आनंदात सदा उसळावं
आपण आपलं वहात रहावं
कौतुक काठावर पेरत जावं

तुझं पण नदी सारखचं होतं
स्वतःसाठी कधी जगणंच नव्हतं
निरंतर तुझं हसणं होतं, फुलणं होतं
कोमल मनी फक्त बहरणं होत

आजन्म सोबत वचनी बांधलीस
शपथ सुटली म्हणालीही नाहीस
वाटलं होतं येशील चोरपावली
ना तू फिरकलीस, ना तुझी सावली

किती रंगला होता गं डाव
खोल हृदयी तो अजुनि जपला
तू नाहीस पण तुझ्या खुणा
येतात कधी कधी सोबतीला...

■■■

# सखी

विसरू कसे तुझे ते गीत चांदण्यांचे
विसरेन का सांग सखे रंग मोरपिसाचे
कळलेच ना सरले किती क्षण रात्रींचे
कुणा ठाव किती उमलले दिवस सोनियाचे

येशील का ओढून ती शाल मखमली
घेशील मज मिठुनि धरुनि अधर सावली
अंधारून टाक मला घनगर्द कुंतली
येशील लपवित श्वास तेच चोरपावली

तुजविण अंगणी तव तुळस बघ कोमेजली
परसदारी साद द्याया गायही नच हंबरली

■■■

# बांधापल्याड...

गुंफिला हात हळूच सोडवित तू स्वप्नातून जाणे
सहज फसवशी, सदा कसे तव स्वप्नातही बहाणे
लोटून किती युगे गेली, निसटले ते बिलगणे
कोण रोखतो स्वप्नांमधुनि तुझे क्षणांचे येणे

श्रमल्या दमल्या हातांची ती मिठीही आसुसलेली
सोबत तुझी अचानकच कधी गं अशी कशी विलगली
खट्याळ मनाला उगा वाटते दारामागुनि तू लपलेली
आजच कशी गं उंबरठ्यावर तुझी पाऊले ती रुसलेली

सुन्या आठवणी किती दाटती ओल्या भरल्या नयनी
उदास रात्री दिनदिनि रडती मम रोजनिशी वाचुनि
बांध तोडुनि पूर वाहू दे निरंतर लोचनी
नको नको गं थांब तिथे तू बांधापल्याड सजणी

■■■

# साद तुझीच ती

अजून स्मरते, तुझे गीत चांदण्यांचे
चुरल्या राती, स्पर्श मोरपिसाचे
नाही कळले, जिवांचे चांदणे झालेले
धुंद श्वासात कण कण मंतरलेले

ये ना सखे तू, फसवून चोरपावली
ओढून आपुलि, ती शाल मखमली
हरवू दे ना, मज तव घनदाट कुंतली
घे मिटून बरसत, धुंद अधर सावली

ना जाई जुई, गंध उधळत आल्या
ना तुळस अंगणीचि चिंब भिजुनि गेली
पहाट झाली, कानी कुजबुज ओली
साद तुझीच ती, आठवण होऊन आली!

■■■

# तू

मी ओळखून आहे तुझ्या पापण्यांची साद
मऊ दुलई ओढू घेते रंगल्या रातींची याद
माळून गजरा मोगऱ्याचा, रात सुगंधी न्हाते
लाजलाजूनी रातराणी ती हळूच कुशीत शिरते

ओळखून उताविळ, माझ्या नजरेची पाखरं
चूर लाजुनि तुझी कळी मग उमले हळुवार
देऊ नको सखे, असे ते तुझे आळोखे पिळोखे
बोलावित ऊन्हा कोवळ्या, क्षणात उगवे दिवसधुके

ओठस्पर्श तव मोरपिशी, रात हरखूनी जाते
थरथर होई काळजात अन् दूर ज्योत लाजून मिटे
जड झालेले ओठ तुझे अन् कुजबुज कानी उरली
उबदारशा मिठीत माझ्या नकळत पहाट न्हाली

जपली रातीची आहे याद कुपीत जपली मनी
शब्द जरी वाऱ्यावरी गेले, गात्रे गेली थकुनी
खट्याळ हासत ओळ अंती तूच छेडली कानी
एक रानटी वाट फुटावी का त्या शय्येवरुनि

■■■

## प्राक्तन

का तुम्ही सरळ निघुन जावे
विस्कटून श्वास कळ्यांचे
नुकतेच बिलगले होतो ना
गळा हात कोवळ्या चांदण्यांचे

प्रारब्ध म्हणा दुर्दैव म्हणा
सटवाईचे लिखाण म्हणा
कसे जगायचे सांगा आम्ही
पहायचा तरी होता ताठ कणा

अजून ना पाठीवर फिरला हात
ना छातीवर उघड्या नीज निवांत
ना दिशा ना ठावे अंतर किती कोस
सोडून चार उसासे बैठक पडली ओस

फक्त उमलायला अवसर हवा होता
सुगंध नसातून घुमायला हवा होता
आलिंगने तुम्हां घट्ट द्यायचीच होती
तुमचे हसायचे राहिलेच त्या इवल्या राती

उमजले आम्हा सत्य जीवनाचे
होऊन पोरके इथे कसे जगायाचे
नका व्यर्थ सांगू, दोषुनि ती नियती
कळले यमसदनी तेवते प्राणज्योती

■■■

# संकेत

वेचून रातराणीचा
मंद, धुंद श्वास
कधी जाईजुईचा बहर
भरगच्च, उरी भरून
तर कधी गंधीत शुभ्र
टपोरा, मोगरा माळून
असो घनदाट अंधाऱ्या
अवसेच्या स्तब्ध राती,
वा शिंपिल्या चांदण्या
एकाकी शय्येवरती
मी वाट पहातो आहे...

मीलनाचा संकेत तुझा
विरला सर्द पापण्यात
बघ दूत उभे उषेचे
व्यापून आसमंत

■■■

# साथ संगत

सवे जायचे होते ना सखे दूर त्या क्षितिजा पलीकडे
ओलांडली ना वेस तोवरी एक पाऊलहि नच तोकडे

नाही कळले मला क्षितिजी सांज ग झाकोळली
ते उमलणे उमजलेच ना, का पाकळी विलगली

केवढा तो जोश, उन्मेष सारीपाट मांडताना
एकटाच फेकतो फासे सोंगट्या उदासताना

किती वसंत, वर्षा वाजत गाजत आले गेले
तुझे सखे ते हसणे फुलणे पहायचे राहूनच गेले

थकलो आता वाट पाहुनि, डोळे सुकले अधाशी
पेलवेना पापण्याना प्रतीक्षा सांग रुजवात घालू कशी

किती दूर क्षितिज, मी चालतो एकला काट्यावरी
राहीन उभा तोवर तेथे, पण देईन साद हाकेवरी

का अचानक झाले आपुले मार्ग वेगळाले
आज का ते श्वासलेले गंध सारे पांगले

नव्हताच कधी तू सोडलास हात माझा मोकळा
नजर पडता चाफेकळीवर श्वास आजही कोंडला

■■■

# आर्तता

नयनातले भाव, भावना वाचेल कधी कुणीही
काळजाच्या आर्ततेला तुजवीण जाण नाही
श्वासातल्या लयीचाही चुकुनी येईल सांगावा
उरी छेडल्या झंकाराला तसाच ठेका कुणी धरावा

निरपेक्ष दाट तव मैत्री जणू जुळ्याचेच ते दुखणे
राहो निरंतर साथ तुझी म्हणुनि माझे लाख बहाणे
विसरू कसे तुझे ते आर्त नयनी दारी उभे रहाणे
क्षणात दुसऱ्या भेटी बिलगुनि उरातुनि विरघळणे

लांब झाल्या सावल्या तरी रुसवा तुझा असा का
नाही जुळणार कधीच तारा त्या छेडण्या पुनः का
साथ तुझी युगेयुगांची वाटे, मग स्वप्ने उसवलीस का
सोबत तुझी सुटली सखे तरी भैरवी अर्धीच का

नजर माझी पैलतीरी तिथे कशी अजून तू
जड झाल्यात ग आठवणी का होतेस चाहूल तू
दिसलीस उभी तू देखणी उजळून दीप अंगणी
जाणून भासच हा रुसे शुक्राची मनी चांदणी

■■■



अनिल नारायण कुलकर्णी

माणूस जगण्यातलं आव्हान स्वीकारत जेंव्हा पुढं जात रहातो, तेंव्हा त्याच्या पावलापावलावर नवे अनुभव जगण्याची कला शिकवण्यासाठी उभे ठाकतात. त्यातच जर तो माणूस संवेदनशील असेल, तर त्याच्यातील संवेदना त्याच्या अनुभवांना कलात्मकतेची झालर लावून सर्जनशीलपणे कशी व्यक्त होते... याचं उत्तम उदाहरण म्हणजे श्री. अनिल कुलकर्णी यांची कविता.

**'वय माझे पाच हजार...'** हा अशाच जगावेगळ्या अनुभवांतून सिध्द झालेला काव्याविष्कार आहे. त्यांच्यातील रसिकतेने, सकारात्मकतेने आणि हळव्या स्वभावाने जणू कविताच त्यांच्या प्रेमात पडली असावी... असं वाटायला लावणारा हा कवितासंग्रह काव्यरसिकांना निश्चितच भावेल. त्यांना कविता सुचत नसावी ती थेट त्यांना दिसत असावी... इतका साधा, रसळ, पण तितकाच विचार करायला लावणारा हा काव्य बहर रसिकांना निश्चितच लुभावेल यात तीळमात्र शंका नाही!

विज्ञान शाखेची पदवी घेतल्यानंतर खोपोलीतील पारखे उद्योग समुहाच्या पेप्को या कागद मिलमध्ये ज्युनिअर केमिस्ट म्हणून सुरू झालेली त्यांच्या कारकिर्दीची चढती कमान याच औद्योगिक क्षेत्रात कुरकुंभ येथील फायबर बोर्डस् लिमिटेडमध्ये प्रेसिडेंट पदापर्यंत पोहोचली. पूर्वपिढीचे संस्कार, एकत्र कुटुंबाची ताकद आणि जगण्यावर भरभरून प्रेम करण्याची वृत्ती या कविता संग्रहाच्या पानापानात अनुभवसिध्दपणे साकारली आहे.

चतुरंग प्रकाशन